| | | |
|---|---|---|
| सत्यमेव जयते | उपजिल्हा रुग्णालय, गडहिंग्लज<br>( महाराष्ट्र शासन ) | |
| दुरध्वनी क्रं. (वै)<br>कार्यालय दुरध्वनी क्रं. | ०२३२७-२२६६४४<br>०२३२७-२२६६४२ | उपजिल्हा रुग्णालय, चर्चरोड, गांधीनगर गडहिंग्लज,<br>पिन. नं. ४१६ ५०२ E-mail :- sdhgadhinglaj@gmail.com |
| आरोग्य सेवा | जा.क्रं.उजिरुग/औषध भांडार/सन २०२६-२७ औषधे खरेदी/दरपत्रक मागणी जाहीर नोटीस/<br>/२०२६ दिनांक:- २२/०४/२०२६ | |


# जाहीर प्रसिध्दी नोटीस

विषय:- डायलेसिस साहित्यसामुग्री खरेदी करणेस्तव दरपत्रक सादर करणेबाबत....

संदर्भ:- या कार्यालयाची दि.२१/०४/२०२६ रोजीची मंजूर टिपणी

उपजिल्हा रुग्णालय गडहिंग्लज, जि. कोल्हापूर या रुग्णालयास संदर्भिय मंजूर टिपणीनुसार डायलेसिस साहित्यसामुग्री खरेदी करावयाचे आहे. याकरीता उत्पादक, वितरक, पुरवठा धारक, अधिकृत विक्रेता यांचेकडून खालील अटी व शर्तीनुसार सिलबंद लिफामध्ये दरपत्रके स्थानिक स्तरावर मागविणेत येत आहेत. तेव्हा दरपत्रक सादर करु इच्छिणा-यांनी रुग्णालयाच्या कार्यालयामध्ये नोटीस बोर्डला भेट दयावी. तसेच दरपत्रके स्विकारण्याचा अंतिम दि. ३०/०४/२०२६ रोजी संध्याकाळी १७.०० वाजेपर्यंत असा असून तदनंतर आलेली दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी. तसेच सदर औषध खरेदीसाठी राबविणेत येणा-या दरपत्रक प्रक्रियेचा कालावधी हा एक वर्षाचा असेल.

### दरपत्रक करीता नियोजित कालावधी

| अ. क्रं. | दरपत्रक सादर करण्याचा तपशिल | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १. | दरपत्रक सिलबंद लिफाफा सादर करण्याचा कालावधी | दि.२२-०४-२०२६ ते ३०-०४-२०२६ |
| २. | दरपत्रके उघडणे व तुलनात्मक करण्याचा दिनांक | दि.०४-०५-२०२६ दुपारी १२.३० वाजता |

### दरपत्रक सादर करावयाची खरेदीची बाब व दराचा तपशिल

| Sr. No. | Name of Item | Packing Unit | Rate/Unit |
|---|---|---|---|
| 1. | डायलेसिस साहित्यसामुग्री सोबत यादी अ. क्रं.०१ ते २२ पर्यंत जोडली आहे. (पान क्रं 07 ते 11) | १ No. | |

**अटी व शर्ती:**

१) दरपत्रक प्रक्रियेमध्ये सहभाग नोंदविणा-या उत्पादक/पुरवठाधारकांनी दोन सिलबंद लिफापा पध्दतीमध्ये लिफापे सादर करावेत, एका सिलबंद लिफापामध्ये एकच दरपत्रक लेटरहेडवर सादर करावे, यामध्ये प्रयोगशाळा तपासणी किट व साहित्यसामुग्री यांचे दर नमूद करताना फक्त एका नगाचे दर नमूद करावेत व या लिफापावर "दराचा लिफापा" असा उल्लेख करावा, त्याचबरोबर दुसरा लिफापा हा अटी व शर्तीमध्ये नमूद केलेल्या दस्तऐवजांचा असावा त्या लिफापावर (तांत्रीक लिफापा) असे नमूद करणे बंधनकारक असून दरपत्रक प्रत्यक्ष अथवा पोस्टाने सादर करण्याचे आहे.

२) प्राप्त झालेल्या दरपत्रकामधील उत्पादक/पुरवठाधारक यांचा प्रथम तांत्रीक लिफापा उघडण्यात येऊन नमूद अटी व शर्तीनुसार तांत्रीक दृष्ट्या पात्र असणा-या पुरवठाधारक यांचाच दराचा लिफापा उघडण्यात येईल.

३) डायलेसिस साहित्यसामुग्री नमूद Specifications प्रमाणे उत्तम दर्जाची, त्याचप्रमाणे त्याचे दर बाजारभावापेक्षा जास्त नसावेत,तसेच दरपत्रकात GST क्रं. नमूद करावा, GST क्रमांक लागू नसल्यास तत्सम प्राधिकारी यांचे नोंदणी क्रमांक नमूद करावा.

४) डायलेसिस साहित्यसामुग्री यांचे दर दरपत्रकात नमूद करताना सर्व करासह (Inclusive of All Taxes) करणे आवश्यक. (दर सादर करताना सर्व शासकीय कर, वाहतुक भाडे, भरणी व उतरणी तसेच हमाली सहीत करावेत.)

५) दरपत्रक प्रक्रियेमध्ये सहभाग नोंदविणेसाठी कमीत कमी एक अथवा दोन वर्षाचा शासकीय संस्थेमध्ये वरील मटेरियल पुरवठा केले संदर्भातील अनुभव असणे आवश्यक आहे. यास्तव २०२५-२६ मधील शासकीय संस्थेना पुरवठा केलेबाबतचे पुरवठा आदेशाच्या छायांकित प्रती या सत्य प्रत करुन सादर करावयात.

६) वरील साधनसामुग्री पुरवठा केल्यानंतर एक वर्षाचे आत त्याच्या गुणवत्ताबाबत कोणतेही तक्रार अथवा दोष आढळल्यास पुरवठा आदेशानुसार सदर साधनसामुग्री बदलून देणे बंधनकारक राहील. यासाठी कोणतेही देयके संदर्भातील अतिरीक्त अदयायगी केली जाणार नाही.

७) दरपत्रक खरेदी प्रक्रियेतील नमुद डायलेसिस साहित्यसामुग्री ही वेळोवेळी गरजेनुसारच खरेदी केली जाणार आहेत याची दखल घ्यावी. तसेच दरपत्रकातील डायलेसिस साहित्यसामुग्री रुग्णालयाच्या गरजेनुसार खरेदी करणेत येतील, पुरवठा ७ दिवसात अथवा तात्काळ रुग्णालय आवश्यकते नुसार रुग्णालय औषधभांडार विभागात करणे बंधनकारक राहील.

८) खरेदी करणेत येणारी डायलेसिस साहित्यसामुग्री ही MJPJAY व AB – PMJAY व इतर योजनेतून खरेदी केली जाणार असून अत्यावश्यक वेळी मटेरियलची उपलब्धता ही बाब विचारात घेता स्थानिक पातळीवरील १०० इतक्या किलोमीटर परीघ कार्यक्षेत्रातील उत्पादक/पुरवठाधारकांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल. तसेच नजीकच्या मुदतबाहय दिनांक असलेली प्रयोगशाळा तपासणी किट व साहित्यसामुग्री स्वीकारली जाणार नाहीत, उपप्रमाणकावर उत्पादकाचे नाव, बॅच क्रमांक व एक्सपायरी दिनांक असणे आवश्यक आहे.

९) दरपत्रकासोबत दरपत्रक धारक यांचे अन्न व औषध प्रशासन विभागाचे वैद्य नोंदणी प्रमाणपत्र ( Drug Licence Certificate ), शॉप ॲक्ट प्रमाणपत्र व संस्थेचे पॅनकार्ड अथवा संस्था चालकाचे पॅनकार्ड यांच्या प्रतिस्वाक्षरी छायांकित प्रती जोडेणे आवश्यक.

१०) दरपत्रक धारक यांचा सेवा खरेदी प्राधिकारी यांचे बरोबर कोणत्याही प्रकारचा हित संबंधाचा संबंध नसल्याबाबत दरपत्रकासोबत हमीपत्र विहित नमून्यात जोडेणे आवश्यक राहील. (हमीपत्र प्रपत्र अ)

११) दरपत्रक कोणतेही कारण न देता स्विकारणे अथवा नाकारण्याचा सर्व अधिकार कार्यालय प्रमुख यांनी राखून ठेवला आहे. याबाबत कोणताही पत्रव्यवहार स्विकारला अथवा केला जाणार नाही. तसेच खरेदी संदर्भातील कोणतीही कायदेशीर प्रक्रिया उद्‌दभवल्यास त्या संदर्भातील मुख्यालय उपजिल्हा रुग्णालय, गडहिंग्लज हे राहील.

१२) खरेदी प्रक्रियेतील नमूद अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. (हमीपत्र प्रपत्र ब)

१३) डायलेसिस साहित्यसामुग्री हे या कार्यालयाकडून पुरवठा आदेश दिल्यानंतर आदेशातील नमूद मुदतीत प्राप्त न झालेस देयक रक्कमेच्या ०.५ टक्के प्रमाणे प्रती आठवडा विलंब आकार वसूल केला जाईल.

१४) डायलेसिस साहित्यसामुग्री पुरवठा करताना ती फक्त WHO GMP/ISO मानांकन/ ISI मानांकन उत्पादीत असणे बंधन कारक राहील.

१५) खरेदी प्रक्रियेतील न्यूनतम दर असलेला पुरवठा धारक डायलेसिस साहित्यसामुग्री पुरवठा करणेस टाळा टाळ करीत असलेस अथवा तो असमर्थता दर्शवित असेल अशावेळी त्या खालोखाल दर असलेल्या पुरवठा धादकास समितीने निश्चित केलेल्या दरानुसारच डायलेसिस साहित्यसामुग्री पुरवठा करणेसाठी पुढील पर्याय म्हणून पुरवठा आदेश देण्याचा विशेष अधिकार हा कार्यालय प्रमुख यांनी राखून ठेवला आहे.

१६) दरपत्रकातील नमूद अटी व शर्तीमध्ये अंर्तभाव करणे किंवा वगळण्याचा (कोणत्याही वेळी ) पुर्ण अधिकार हा कार्यालय प्रमुख यांनी राखून ठेवला आहे.

१७) महाराष्ट्र शासन/ केंद्र शासन/ स्थानिक स्वराज्य संस्था / शासकीय व निमशासकीय संस्थेने काळया यादीत टाकलेल्या कोणत्याही उत्पादक व पुरवठा धारकास या दरपत्रक प्रक्रियामध्ये सहभाग घेण्यास मनाई असेल.

१८) दरपत्रक प्रक्रियेमध्ये एकाच डायलेसिस साहित्यसामुग्री चे दर न्यूनतम सारखे असतील तर त्या दराबाबत वाटाघाटी करणेत येवून जो पुरवठाधारक वाटाधाटी अंतर्गत दर कमी करेल अशा पुरवठाधारकास प्राधान्य दिले जाईल.

१९) दरपत्रक प्रक्रियेमध्ये सादर करण्यात येणारे दस्तऐवज हे वाचनीय व सत्यप्रत हि शासकीय राजपत्रीत अधिकारी यांच्या स्वाक्षरीने सादर करणे बंधनकारक राहील.

२०) उत्पादक अथवा पुरवठाधारक यांनी पुरवठा आदेशानुसार डायलेसिस साहित्यसामुग्री पुरवठा केलेनंतर प्रशासकीय कारणास्तव देयक अदयायगीस या कार्यालयाकडून विलंब झालेस देयक रक्कमेस कोणतेही विलंब आकार व्याज अदा केले जाणार नाही.

२१) दरपत्रक प्रक्रियेमध्ये सहभाग नोंदविलेल्या सर्व पुरवठा धारकांकडून या कार्यालयाच्या गरजेनुसार आयकर व जीएसटी परतावा प्रमाणपत्र मागणी केलेस कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

२२) पुरवठा आदेशाच्या अनुषंगाने डायलेसिस साहित्यसामुग्री पुरवठा केले नंतर कार्यालयाकडे दोन प्रतीमध्ये उपप्रमाणक व डिलेव्हरी चलन सादर करावे, तसेच या कार्यालयाकडून देयक अदा करताना देयकातून शासकीय नियमानुसार आयकर /जीएसटी कपात करणेत येईल याची दक्षता घ्यावी.

२३) काही अपरिहार्य कारणात्सव पुढील नविन दरपत्रक प्रक्रिया पुर्ण करण्याचा कालावधी वाढल्यास आपला दरपत्रक कालावधी संपला असला तरी पुढे ९० दिवसापर्यंत या मंजूर दराने करणे आपणास बंधनकारक राहील.

२४) सदर दरपत्रके मंजूर दिनांकापासून एक वर्षापर्यंत अथवा नविन दरपत्रके अस्तित्वात येईपर्यंत लागू राहतील.

२५) संपूर्ण दरपत्रक प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर समिती मार्फत निश्चित करण्यात येणा-या न्युनतम दर असणा-या दरपत्रक धारकास रु.५००/- शुल्काच्या स्टॅम्पपेपर वर दरपत्रकातील अटी व शर्तीनुसार करारनामा सादर करणे बंधनकारक राहील.

(डॉ.सी.जे.खोत)
वैद्यकिय अधिक्षक,
उपजिल्हा रुग्णालय, गडहिंग्लज
जि. कोल्हापूर

# उपजिल्हा रुग्णालय गडहिंग्लजकरिता
# सन एप्रिल २०२६ - मार्च २०२७
# खरेदी करावयाच्या DIALYSIS MATERIAL यादी

| Sr No | Name Of Medicine | Spicification | Rate (Inclusive Of All Taxes) ( 1 No Rate) |
|---|---|---|---|
| 1 | Liq Citrosteril ( Fresenius) 5 Ltr | Can | |
| 2 | Liq Renaclean 5 Ltr | Can | |
| 3 | Concentrated Hemodialysis Solution Liq Acid ( Part A) 10 Ltr | Can | |
| 4 | Sodium Bicarbonate Powder ( Part B) | Pkt | |
| 5 | Reload 60 MM Blue | Pkt | |
| 6 | Reload 80 MM Green | Pkt | |
| 7 | Reload 80 MM Blue | Pkt | |
| 8 | Reload 60 MM Green | Pkt | |
| 9 | Disafe Filter | Pkt | |
| 10 | F 6 Dilyzer Filter | Pkt | |
| 11 | Tubing Set | Pkt | |
| 12 | Fixmol | Pkt | |
| 13 | F 8 HPS Dialyzer | Pkt | |
| 14 | Tranducer | Pkt | |
| 15 | A V fistula Needle 17 G | Pkt | |
| 16 | A V fistula Needle 16 G | Pkt | |
| 18 | Suction Tubing | Pkt | |
| 19 | Vein Finder | Pkt | |
| 20 | Fixo Sticking | Pkt | |
| 21 | Dora ( Single Use ) Dialyzer | Pkt | |
| 22 | Tricarb Solution 50 | Pkt | |
| | उत्पादक अथवा पुरवठाधारकांनी औषधांचे दर सादर करताना ते प्रति नग सर्व करासहित भरावेत | | |

वैद्यकीय अधिक्षक वर्ग-१
उपजिल्हा रुग्णालय,गडहिंग्लज
जिल्हा कोल्हापूर

# प्रपत्र अ

## दरपत्रकधारकाने दयावयाचा हमीपत्राचा नमुना

मी / आम्ही ........................................................... या हमी पत्राव्दारेलिहून देतो की, दरपत्रक मागविणा-या खरेदी प्राधिका-यासोबत आमचे / माझे कोणत्याही प्रकारचे हितसंबंध नसुन हितसंबंधाबाबत संघर्ष नाही. तसेच खरेदी प्राधिका-यांकडे सादर करणेत आलेले दरपत्रक मी एकटयानेच भरले असून दुस-या कोणत्याही दरपत्रक धारकासोबत संयुक्तरित्या किंवा संघनमताने साखळी करुन भरलेले नाही. असे आढळून आल्यास मला दरपत्रक प्रक्रियेच्या कोणत्याही स्तरवरुन बाद करणा-याचा अधिकार खरेदी प्राधिकार ( मा. वैद्यकिय अधिक्षक ) यांना आहे. याबाबत मला / आम्हांला न्यात असून नियमानुसार योग्य त्या दंडात्मक अथवा योग्य त्या प्रशासकीय कार्यवाहीसाठी मी / आम्ही पात्र राहील.

दरपत्रक धारकाची सही व शिक्का